# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.२९/०१/२०१८
## दि.२८/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ३१/१८,भादविक ३०७,३४१,४३५,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | अमित खाटणे,वय २९ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे् |
| **आरोपी** | १)आनंद कामठे, २) अमित साळुंखे, ३) किरण ढमढेरे, सर्व रा.बिबवेवाडी ओटा बिबवेडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०१/२०१८ रोजी १५/३० व.चे सुमारास भगवा चौक, ब्रम्हा भेळ समोर, बिबवेवाडी ओटा,बिबवेवाडी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी आले असता, यातील नमुद इसमांनी त्यांना थांबवुन, अ.क्र.१ याने त्यास कॉलर पकडुन नाकावर जोरजोरात ठोसे मारुन, अ.क्र.२ याने त्याचे हातातील फरशी थांब तुला जिवे मारुन टाकतो असे म्हणुन हातातील फरशी डोक्यात मारुन जखमी करुन, अ.क्र.३ याने हातातील प्लास्टिकच्या बाटलीतील पेट्रोल अंगावर व दुचाकी गाडीवर ओतुन फिर्यादी यांची दुचाकी गाडी पेटवुन देवुन, नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.के.बिराजदार ८६९१९५०००० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४३/१८,भादविक ३०७,३५३,३३२,३४, मो.व्हे.अॅ. क. १८४ |
| **फिर्यादी** | हेमंत खरात,पो.ना.गुन्हे शाखा,युनिट ४,पुणे शहर |
| **आरोपी** | १)दिपक सोनी व त्याचा साथीदार गाडी एम.एच.४३ एन.४०६ या नंबरची लाल रंगाची मारुती झेन यावरील चालक (आटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०१/२०१७ रोजी सायंकाळी १७/१० वा.ते १७/२० वा.चे दरम्यान अनगळ पार्क समोर चतुःश्रृंगी पायथा,सेनापती बापट रोड पुणे ते सी.पी.आर.गेट पाषाण रोड,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी वरिष्ठाचे आदेशाप्रमाणे सरकारी काम करण्यासाठी चतुःश्रृंगी पायथा,सेनापती बापट रोड पुणे येथे थांबले असताना, यातील नमुद इसम दिपक सोनी व त्यांचे साथीदार यांनी आपसात संगणमत करुन व त्यांना फिर्यादी हे पोलीस असल्याचे माहित असुन सुध्दा त्यांनी फिर्यादी यांना सरकारी काम करु न देता सरकारी कामात अडथळा आणला व फिर्यादीचे अंगावर गाडी घालुन फिर्यादीला गाडीचे बॉनेटवर पडले असता फिर्यादीला एक ते दिड किलो मिटर फरफटत नेवुन फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शिंदे ७२७६१००१०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ९५/१८,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | यशवंत माने,वय २४ वर्षे,रा. थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | रिक्षा नं.एम.एच.१४/व्ही/६७१४ मधिल चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०१/२०१८ रोजी रात्री १२/२० वा.चे सुमारास वाकड ब्रिज जवळ, सार्वजनीक रोडवर, वाकड पुणे व वाकड गावठान येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी हे वर नमुद ठिकानी आराम करीत असताना, रिक्षा नं.एम.एच-१४/व्ही-६७१४ मधिल चार अनोळखी इसम फिर्यादी यांचे जवळ येवुन, त्यांनी फिर्यादीस हाताने मारहान करून,फिर्यादीकडून दोन मोबाईल व रोख रक्कम व इतर कागदपत्र असा एकुण ११ हजार ५००/- रुपये किंमतीचा माल जबरदस्तीने हिसकावून घेवून गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.आर.लोंढे ८८८८८३६००७ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** मार्केट यार्ड पो स्टे २३/१८,भादविक ३९२,५०६(१),३४

**फिर्यादी** उमेश वाघमोडे,वय ४५ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे

**आरोपी** १)रॉबीनसिंग चिन्नुसिंग टाक,रा.सर्व्हे नं.५७० आंबेडकर नगर मार्केटयार्ड,पुणे २)योगेश (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०१/२०१८ रोजी रात्रौ १०/३० वा.चे सुमारास अंबादास जाधव यांच्या दुकाना समोर केळी मार्केट पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी व त्यांचे सहकारी शंभुनाथ रामफकिर यादव असे नमुद ठिकाणवरुन जात असताना, यातील नमुद इसमांनी त्यांचे जवळ येवुन, त्यांना शिवीगाळ व दमदाटी करुन, फिर्यादी यांचे जवळील रोख रक्कम १ हजार ५००/- रुपये व त्यांचे सहकारी शंभुनाथ यादव यांचे जवळील रोख रक्कम ५००/- रुपये असा एकुण २ हजार रुपये जबरदस्तीने काढुन, घेवुन, पोलीसात तक्रार केली तर जिवे मारण्याची धमकी दिली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.एस.धुमाळ ९९२२६०१४४४

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** हिंजवडी पो स्टे ६४/१८,भादविक ४०८

**फिर्यादी** चंद्रशेखर निम्हण,वय ३३ वर्षे,रा.पाषण,पुणे

**आरोपी** अनिल नारायण बुजडे,वय ४५ वर्षे,रा.भास्कर आनंद अपार्टमेंट फ्लॅट नं.४०१ साकोरे नगर, लेन नं.५ विमाननगर, पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२१/०१/२०१८ रोजी ते दि.२५/०१/२०१८ रोजीचे दरम्यान सन्नीज वर्ल्ड रिसॉर्ट स.नं.२१७ सुसगाव,ता.मुळशी,जि.पुणे

**तपशिल** वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसम अनिल बुजडे, हा सन्नीज वर्ल्ड रिसॉर्ट येथे जनरल मॅनेजर म्हणुन कामास असताना, त्यांनी सदर रिसॉर्ट मधील हॉटेल रिसॉर्ट रुम्स पार्टी लॉन्स मधील कॅशिअरकडुन तसेच पार्टीलॉन्सचे बुकींगचे अंदाजे एकुण १६ लाख रुपये एवढी रक्कम स्विकारुन सदरची रक्कम ऑफिसमधील अकाऊंटंट इसम नामे- सागर नागवडे, यांचेकडे जमा न करता ती स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता वापरुन, सदर रक्कमेचा अपहार करुन, विश्वासघात केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. ए.एल.गवारी

## <u>दि.२९/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** उत्तमनगर पो स्टे १०/१८,भादविक ३०७,१४३,१४४,१४७,१४८,३४,३२३,५०४

**फिर्यादी** विनय साळवे,वय २४ वर्षे,रा.शिवणे, ता.हवेली,जि.पुणे

**आरोपी** १)हर्षद रायरेकर,रा.रामनगर,वारजे,पुणे २)गणेश शिंदे,रा.नांदेड गाव, ३)दिनेश वांजळे, रा. कोपरे गाव, ४)मुन्ना शेडगे,रा.रामनगर, वारजे,पुणे ५)अक्षय शिंदे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२८/०१/२०१८ रोजी १२/१५ वा.चे सुमारास शिवणे येथील मॉन्जीनीस दुकानासमोर शिवणे,पुणे

**तपशिल** वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे मॉन्जीनीच्या शिवणे येथील दुकानात गेले असता, यातील नमुद इसमांनी जुन्या भांडणाचे कारणावरुन मनात राग धरुन, फिर्यादी यांना कोत्याने दांडक्याने, हाताने मारहाण करुन, जिव घेण्याच्या उद्देशाने डोक्यावर कोयत्याने वार केला असता तो वार फिर्यादी यांनी चुकविला असता, डाव्या भुवईच्या वरती कोयता लागला असुन, फिर्यादीस गंभीर जखमी करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. बी.बी. पिंगळे ९८८१३८९१७८

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३३/१८,भादविक ३५३,३३३,३२३,३५२,४२७,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | प्रदिप पोटे,पो.ना.सहकारनगर, पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)कुणाल माणिकराव फरांदे, वय २८ वर्षे,रा.सर्व्हे नं.१७ फॉरेस्ट भिंती शेजारी, अंबेगाव पठार, धनकवडी,पुणे २)साधना कुणाल फरांदे,वय २८ वर्षे,रा.सदर ३) गीता अरुण रिढे,वय ४५ वर्षे,रा.सदर ४) प्रिती राज यादव,वय ३२ वर्षे,रा.वाघोली गाव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०१/२०१८ रोजी २०/३० वा.चे सुमारास धनकवडी चौकी पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे चौकी अंमलदार म्हणुन कर्तव्य करीत असताना, इसम नामे कुणाल फरांदे, व अनिश सरनाईक यांच्यावर सहा.पो.निरी.कोळी सो, यांचे सुचनेप्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई म्हणुन सीआरपीसी १५१(१) प्रमाणे कारवाई करीत असताना, इसम नामे कुणाल फरांदे व त्यांची पत्नी साधना फरांदे, सासु गिता रिढे, व बहिण प्रिती यादव, यांनी फिर्यादी यांचे समक्ष अनिश सरनाईक व त्यांची पत्नी स्नेहल यांचे अंगावर धावुन, जावुन, त्यांना शिवीगाळ करुन, तसेच अनिश याला चौकीच्या बाहेर आल्यास मारण्याची धमकी देत असताना तेव्हा फिर्यादी हे त्यांना आडविण्याचा प्रयत्न करीत असताना, नमुद इसम व महिला यांनी मोठमोठयाने आरडाओरडा करुन, गोंधळ करुन, शिवीगाळ करुन, तसेच प्रिती यादव हिने पोलीस शिपाई पांचाळ यांचे हाताला चावा घेवुन, जखमी करुन, पोलीस चौकीतील खुर्ची तोडुन सुमारे ६००/- रु.चे नुकसान करुन, फिर्यादी व त्यांचा स्टाफ करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.मोरे ९८७०३२७७०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**